दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज
सोशल मीडियाच्या
माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील
लोकप्रिय दैनिक



• वर्ष : ०४ • अंक : ०४९ • पुणे • गुरुवार, दि. २९ ऑक्टोबर २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313

पदवीधरमध्ये भाजपाला धक्का

हर्षदा जाधव-शिक्कामोर्तब; भाजपाच्या डॉ. स्मिता जाधव यांचा ९,९२८ मतांनी पराभव; ४४ व्या बाद फेरीत विजयावर शिक्कामोर्तब

महाराष्ट्र विधान परिषदेच्या पुणे पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या हर्षदा जाधव-देशमुख (राष्ट्रवादी काँग्रेस- शरद पवार) विजयी झाल्या. त्यांनी भाजपच्या डॉ. स्मिता जाधव यांचा ९ हजार ९२८ मतांनी पराभव केला. दरम्यान पहिल्या पसंतीच्या मतांमध्ये कोणत्याही उमेदवाराला विजयासाठी आवश्यक असलेला कोटा गाठता न आल्याने मतमोजणीची प्रक्रिया ४४ व्या बाद फेरीपर्यंत लांबली. बुधवारी रात्री उशिरा हर्षदा जाधव-देशमुख यांनी विजयासाठीचा कोटा पूर्ण केल्यानंतर त्यांच्या विजयावर शिक्कामोर्तब करण्यात आले.या निकालामुळे पदवीधर मतदारसंघावरील वर्चस्व कायम राखण्यात राष्ट्रवादी काँग्रेस ला यश आले असून, भाजपला धक्का बसला आहे.





पुणे विभाग पदवीधर मतदार संघातून विजयी उमेदवार श्रीमती हर्षदा देशमुख - जाधव यांना प्रमाणपत्र देताना निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त श्रीमती शीतल तेली- उगले

पुणे (दै. आरंभ पर्व)

पदवीधरसाठी मंगळवारी (२७ ऑक्टोबर) सकाळी आठ वाजता मतमोजणीला सुरुवात झाली. प्रदीर्घ मतमोजणीनंतर बुधवारी रात्री निकाल जाहीर झाला. महाविकासआघाडीच्या हर्षदा जाधव-देशमुख यांना १ लाख १३ हजार ८४० मते मिळाली, तर डॉ. स्मिता जाधव यांना १ लाख ३ हजार ९१२ मते मिळाली. शिवसेनेचे (ठाकरे) उमेदवार सुशील चबरचंद मोदी यांना सुमारे साडेतीन हजार मते मिळाली.

या निवडणुकीच्या निमित्ताने भाजपने पदवीधर मतदारसंघ प्रतिष्ठेचा केला होता. विद्यमान आमदार अरुण लाड यांचे पुत्र शरद लाड यांनी निवडणुकीपूर्वी भाजपमध्ये प्रवेश केल्याने राजकीय समीकरणे बदलली होती. शरद लाड यांना भाजपची उमेदवारी मिळण्याची शक्यता व्यक्त होत असतानाच पक्षाने ऐनवेळी डॉ. स्मिता जाधव यांना उमेदवारी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या निवडणुकीत वैयक्तिक लक्ष घातले होते. मात्र, पक्षाची संघटनात्मक ताकद आणि वरिष्ठ नेत्यांचे प्रयत्न यानंतरही भाजपला विजय मिळवता आला नाही. दुसरीकडे, राष्ट्रवादीने या मतदारसंघावरील वर्चस्व कायम राखले. त्यामुळे या निकालाचे महत्त्व केवळ एका जागेवरील विजयापुरते मर्यादित नसून, भाजप आणि महाविकास आघाडीतील राजकीय संघर्षाच्या दृष्टीनेही महत्वपूर्ण ठरणार आहे. वैध-अवैध मतांची छाननी पूर्ण झाल्यानंतर विजयासाठीचा कोटा सुमारे १ लाख १३ हजार ९५ मतांचा निश्चित करण्यात आला होता. पहिल्या पसंतीच्या मतांची मोजणी पूर्ण झाल्यानंतर कोणत्याही उमेदवाराला हा कोटा गाठता आला नाही. त्यामुळे कमी मते मिळालेल्या उमेदवारांना क्रमाक्रमाने बाद करून त्यांच्या मतपत्रिकांवरील पुढील पसंतीच्या मतांचे हस्तांतरण करण्यात आले. या प्रक्रियेमुळे मतमोजणीला विलंब झाला आणि निकालाबाबतची उत्सुकता वाढली. २१ व्या बाद फेरीअखेर हर्षदा जाधव-देशमुख यांना १ लाख ११ हजार २७९ मते मिळाली होती. त्या वेळी डॉ. स्मिता जाधव यांच्याकडे १ लाख २ हजार ४२७ मते होती. त्यामुळे हर्षदा जाधव-देशमुख यांनी ८ हजार ८५२ मतांची आघाडी घेतली होती. त्यानंतरच्या फेऱ्यांमध्ये दोन्ही उमेदवारांच्या मतांमध्ये वाढ होत राहिली; मात्र हर्षदा जाधव-देशमुख यांनी आघाडी कायम राखली. ३१ बाद फेऱ्यांनंतर हर्षदा जाधव-देशमुख यांची मतसंख्या १ लाख ११ हजार ७१७ वर पोहोचली होती, तर डॉ. स्मिता जाधव यांना १ लाख २ हजार ७९७ मते मिळाली होती. या टप्प्यावर दोन्ही उमेदवारांमधील मतांचे अंतर ८ हजार ९२० होते. अखेर ४४ व्या बाद फेरीत हर्षदा जाधव-देशमुख यांनी विजयासाठीचा कोटा पूर्ण केला. त्यांना एकूण १ लाख १३ हजार ८४० मते मिळाली आणि त्या विजयी झाल्या. सन २०२० मध्ये झालेल्या पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे अरुण लाड यांनी भाजपच्या संग्राम देशमुख यांचा पराभव केला होता. त्या वेळी अरुण लाड यांना १ लाख २२ हजार १४५, तर संग्राम देशमुख यांना ७३ हजार ३२१ मते मिळाली होती. लाड यांनी ४८ हजार ८२४ मतांच्या फरकाने विजय मिळवला होता. यंदाच्या निवडणुकीत विजयाचे अंतर कमी झाले असले, तरी भाजपला ही जागा जिंकता आली नाही.

शिक्षक मतदारसंघात १८ वर्षांनंतर भाजपाचा झेंडा

शिवसेनेच्या बंडखोरीचा भाजपाच्या गावडेंना फायदा! शिवसेना पुरस्कृत सचिन सानप यांचा ६,७७० मतांनी पराभव

पुणे (दै. आरंभ पर्व)

पुणे विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत महायुतीतील बंडखोरी आणि मतविभाजनाच्या पार्श्वभूमीवर भाजपचे उमेदवार कौस्तुभ गावडे यांनी विजय मिळविला. त्यांनी शिवसेना पुरस्कृत अपक्ष उमेदवार सचिन सानप यांचा ६ हजार ७७० मतांनी पराभव केला. या मतदार संघातील पहिल्या पसंतीच्या मतांमध्ये कोणत्याही उमेदवाराला विजयासाठी आवश्यक असलेला कोटा पूर्ण करता आला नाही. त्यामुळे बाद फेऱ्यांमधील मतांच्या हस्तांतरणानंतर गावडे यांच्या विजयावर शिक्कामोर्तब झाले. या विजयामुळे तब्बल १८ वर्षांनंतर भाजपला पुणे विभाग शिक्षक मतदारसंघात पुन्हा प्रतिनिधित्व मिळाले आहे. वयाच्या अवघ्या ३०व्या वर्षी विधान परिषदेवर निवडून येणारे गावडे हे या मतदारसंघातील सर्वांत तरुण विजयी उमेदवार ठरले आहेत. शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत महायुतीतील अंतर्गत मतभेदांचा मुद्दा केंद्रस्थानी होता. भाजपने कौस्तुभ गावडे यांना अधिकृत उमेदवारी दिल्यानंतर शिवसेनेने सचिन सानप यांना पाठिंबा दिला. त्यामुळे महायुतीतील मतविभाजनाची शक्यता निर्माण झाली होती. ,काँग्रेसचे विद्यमान आमदार जयंत आसगावकर आणि माजी आमदार दत्तात्रय सावंत हेही रिंगणात होते. या चौरंगी लढतीत सानप यांनी गावडे यांच्यासमोर आव्हान उभे केले. मात्र, मतमोजणीच्या पुढील पसंतीक्रमांच्या फेऱ्यांमध्ये गावडे यांनी आघाडी कायम राखली. सानप यांना दुसऱ्या पसंतीक्रमाच्या मतांचा लाभ झाला, तर सावंत तिसऱ्या आणि आसगावकर चौथ्या क्रमांकावर राहिले.



पुणे विभाग शिक्षक मतदार संघातून विजयी उमेदवार श्री. कौस्तुभ गावडे यांना प्रमाणपत्र देताना निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त श्रीमती शीतल तेली- उगले

वैध मतांनुसार विजयासाठी २५ हजार ७५६ मतांचा कोटा निश्चित करण्यात आला होता. पहिल्या पसंतीच्या मतांमध्ये कोणत्याही उमेदवाराला हा कोटा पूर्ण करता आला नाही. त्यामुळे कमी मते मिळालेल्या उमेदवारांना क्रमाक्रमाने बाद करून त्यांच्या मतपत्रिकांवरील पुढील पसंतीची मते मोजण्यात आली. सहाव्या फेरीअखेर गावडे यांची सानप यांच्यावरील आघाडी ६ हजार २७३ मतांची होती. २४व्या फेरीअखेरही दोघांमधील अंतर जवळपास कायम राहिले. त्यानंतर २५व्या फेरीत खंडेराव जगदाळे यांच्या मतपत्रिकांवरील पुढील पसंतीची मते मोजण्यात आली. या फेरीत गावडे यांच्या मतांत २६५, सानप यांच्या मतांत २४०, सावंत यांच्या मतांत १४३, तर आसगावकर यांच्या मतांत १६५ मतांची भर पडली.

शिवसेनेच्या सानप यांच्या उमेदवारीमुळे महायुतीतील मतांचे विभाजन होईल आणि त्याचा फायदा काँग्रेसला होऊ शकेल, अशी राजकीय वर्तुळात चर्चा होती. मात्र, प्रत्यक्ष निकालात गावडे यांनी आघाडी कायम ठेवली. सानप यांना दुसऱ्या पसंतीच्या मतांचा लाभ झाला असला, तरी तो विजयासाठी पुरेसा ठरला नाही. आसगावकर यांना मिळालेल्या तुलनेने कमी मतांमुळे शिक्षक मतदारसंघातील राजकीय समीकरणांमध्ये बदल झाल्याचे निकालातून स्पष्ट झाले.

१८ वर्षांनंतर भाजपचे प्रतिनिधित्व


पुणे विभाग शिक्षक मतदारसंघात २००८ मध्ये भगवानराव साळुंखे यांनी विजय मिळविला होता. त्यांना भाजपसमर्थित महाराष्ट्र शिक्षक परिषदेचा पाठिंबा होता. त्यानंतर २०१४ मध्ये अपक्ष दत्तात्रय सावंत, तर २०२० मध्ये काँग्रेसचे जयंत आसगावकर निवडून आले. आता कौस्तुभ गावडे यांच्या विजयामुळे भाजपला या मतदारसंघात पुन्हा प्रतिनिधित्व मिळाले आहे. गावडे यांनी वयाची ३० वर्षे पूर्ण केल्यानंतर लगेचच विधान परिषदेवर प्रवेश केला आहे. उमेदवारी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेपूर्वी अवघे तीन दिवस आधी त्यांची ३० वर्षे पूर्ण झाली होती. त्यांच्या विजयामुळे कोल्हापूर जिल्ह्याला पुन्हा एकदा पुणे विभाग शिक्षक मतदारसंघाचे प्रतिनिधित्व मिळाले आहे.

काँग्रेसच्या मतांमध्ये मोठी घट

या निवडणुकीत काँग्रेसचे विद्यमान आमदार जयंत आसगावकर यांना गेल्या निवडणुकीच्या तुलनेत कमी मते मिळाली. २०२० मध्ये आसगावकर यांनी तत्कालीन आमदार दत्तात्रय सावंत यांचा पराभव केला होता. त्या निवडणुकीत आसगावकर यांना २५ हजार ९८५, तर सावंत यांना १५ हजार ३५७ मते मिळाली होती. यंदाच्या निवडणुकीत मात्र आसगावकर चौथ्या क्रमांकावर राहिले.

गुजरातचे दोघे आमचा सह्याद्री पोखरणार?

केंद्रातल्या दोघांकडून मुख्यमंत्री उपमुख्यमंत्र्यांना शून्य किंमत, राज ठाकरेंचा हल्लाबोल



कर्जत (दै. आरंभ पर्व)

कर्जतच्या जंगलातील झाडं तोडली, तिथे गेलो होतो, लाकडे रचून ठेवले होती. जंगलाच्या अंतिम संस्कारला आलोय असं वाटलं. इतक्या वर्षांची जुनी झाडं कोणत्या तरी गुजरात्यासाठी म्हणून कापू टाकतायेत असे म्हणत मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी सरकारवर टीका केली. या प्रकल्पाची काय गरज आहे? असा सवाल राज ठाकरेंनी केला. या सगळ्या गोष्टींच्या मागचे षडयंत्र समजून घेतल पाहिजे. मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री असतील यांना केंद्रात जे दोघेजण बसलेत त्यांच्याकडून शून्य किंमत आहे अशी टीका राज ठाकरेंनी नाव न घेता पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावर केली. इंटरनेट बंद केल म्हणे. इंटरनेट बंद केलं तर सूर्य उगवायचं थांबतो का? मन स्वच्छ असते तर ही करण्याची वेळ आली नसती असी टीका देखील राज ठाकरेंनी केली. 23 प्रकल्पापैकी 3 केंद्र सरकारचे बाकीचे 20 प्रकल्प हे खासगी आहेत. आता एआय डेटा सेंटर येत आहे. त्याला पाणी वीज लागणार आहे. कॉलनी येणार माणसे येणार असे राज ठाकरे म्हणाले. हे तुमच्यासाठी केलं जात नाही असेही राज ठाकरे म्हणाले. छत्रपती शिवाजी महाराष्ट्रातील मावळे म्हणून आम्ही सांगायचे आणि आण्ही उठत नाही. जेवढा विरोध होईल तेवढा हे सरकार वीज बंद करेल, इंटरनेट आता बंद केले आहे. सरकार सांगले या प्रकल्पाची महाराष्ट्राला किती गरज आहे. वीजेची गरज आहे असे सांगतील हे घडवलं जाईल. सगळ्याचं लक्ष महाराष्ट्रावर आहे. हे प्रकल्प दुसऱ्यांसाठी आहेत असे राज ठाकरे म्हणाले. या प्रकल्पाचे टेंडर नाही, काही नाही अशीच जमिन देऊन टाकल्याचे राज ठाकरे म्हणाले. आमचा सह्याद्री पोखरणार? छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र ते दोन लोक चालवणार असे म्हणत राज ठाकरेंनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांच्यावर टीका केली. कशातून हे सगळे येते. आम्ही जे सांगू ते महाराष्ट्रात झालं पाहिजे, हा जमिनीचा तुकडा याला देऊन टाका असेही राज ठाकरे म्हणाले. हे सगळं वरती ठरते. विधानसभेला सांगत होतो महाराष्ट्र यांच्या हातात गेला तर दोन माणसांच्या हातात जाईल, हे दोघे वाटेल ते करतील.

सुनेत्रा पवार यांनी केलेली नियुक्ती अवैध

राष्ट्रवादीच्या नेत्याचा आक्षेप, दोन युवा नेत्यांच्या केल्या आहेत निवडी

मुंबई (दै. आरंभ पर्व)

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाने बुधवारी दोन नव्या निवडी जाहीर केल्या. राष्ट्रीय मुख्य प्रवक्तेपदी सोलापूर जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांची तर मुंबई अध्यक्षपदी आमदार झिशान सिद्दीकी यांची नियुक्ती पक्षाध्यक्ष सुनेत्रा पवार यांनी जाहीर केली आहे.

समीर भुजबळ यांनी मुंबई अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यापासून राष्ट्रवादीचे मुंबई अध्यक्षपद रिक्त होते. आमदार सिद्दीकी हे विधान परिषदेचे सदस्य आहेत. ते काँग्रेसमध्ये असताना वांद्रे पूर्वचे आमदारही होते. राष्ट्रवादी काँग्रेसकडे अल्पसंख्याक विभाग असून मुस्लीम समुदायाकडे पक्षाचे विशेष लक्ष आहे. मुंबईत राष्ट्रवादीच्या सना मलिक या एकमेव आमदार आहेत. तरुण नेता असलेल्या आमदार झिशान सिद्दीकी यांच्याकडे मुंबई अध्यक्षपद दिल्याने पक्ष संघटनेमध्ये उत्साह निर्माण होण्याची पक्षाला आशा आहे.



सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ येथील उमेश पाटील यांची पक्षाचे राष्ट्रीय प्रमुख प्रवक्ते म्हणून निवड करण्यात आली. पाटील यांनी १९९९ मध्ये कृषी विद्यार्थी परिषदेच्या माध्यमातून पक्षात कामास प्रारंभ केला. अडीच दशकांहून अधिक काळ ते पक्षात सक्रीय आहेत. सोलापूर जिल्हा परिषद सदस्य, युवक काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस, युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष, पक्षाचे प्रदेश सरचिटणीस, मुख्य प्रदेश प्रवक्ते अशी पाटील यांनी आजपर्यंत पक्षात पदे सांभाळली आहेत. पाटील हे पक्षाचे खासदार पार्थ अजित पवार यांच्या अत्यंत जवळचे मानले जातात. राष्ट्रवादीचे राष्ट्रीय मुख्य प्रवक्ते बृजमोहन श्रीवास्तव (दिल्ली) यांनी उमेश पाटील यांच्या निवडीवर आक्षेप घेतला आहे.

संपादकाय
विचार आजचा... दिशा उद्याची...

मृत्यूला सोबत घेऊन जगायला शिका

जन्म आणि मृत्यू हे जीवनाचे दोन अटळ सत्य आहेत. ज्याचा जन्म झाला आहे, त्याचा मृत्यूही एक दिवस होणार आहे. हे सत्य प्रत्येकाला माहीत असते; पण ते मनापासून स्वीकारण्याची तयारी फार कमी लोकांची असते. आपण आयुष्यभर जगण्याची स्वप्ने पाहतो, भविष्याची चिंता करतो, नाती जपतो, पैसा कमावतो, प्रतिष्ठा मिळवण्यासाठी धडपडतो आणि अनेकदा या सगळ्या धावपळीत जगण्याचा खरा आनंदच विसरून जातो. मृत्यू समोर उभा ठाकला की मात्र आयुष्य किती क्षणभंगुर आहे, याची जाणीव होते. पण ही जाणीव मृत्यूच्या शेवटच्या क्षणी होण्यापेक्षा ती रोजच्या जगण्यात झाली, तर आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलून जाईल.

मृत्यूची भीती मनात बाळगण्यापेक्षा मृत्यू हे जीवनाचे अंतिम सत्य आहे, हे स्वीकारून जगणे अधिक महत्त्वाचे आहे. कारण मृत्यूला नाकारून आपण त्याला टाळू शकत नाही; उलट त्याचा विचार न करता जगताना अनेकदा वर्तमानातील आनंद आपल्या हातातून निसटून जातो.

आपण उद्याची काळजी करत आजचा दिवस अस्वस्थतेत घालवतो. भविष्यात काय होईल, आपले काय होणार, आपली संपत्ती कोणाला मिळेल, आपल्याशिवाय कुटुंबाचे कसे होईल, आपल्याला अपेक्षित यश मिळेल की नाही, अशा असंख्य प्रश्नांनी मन व्यापून टाकतो. काही चिंता आवश्यक असतात; त्या आपल्याला जबाबदार बनवतात. पण प्रत्येक गोष्ट आपल्या नियंत्रणात असेल, या भ्रमातून निर्माण झालेली चिंता आपले जगणे मात्र कठीण करते.

एक क्षण विचार करा. आपण जन्माला आलो तेव्हा आपल्या हातात काहीच नव्हते आणि मृत्यूच्या वेळीही आपण या जगातून काहीही सोबत घेऊन जाणार नाही. आपल्या कष्टाने मिळवलेली संपत्ती, पद, प्रतिष्ठा, प्रसिद्धी आणि अधिकार हे सारे याच जगात राहणार आहे. आपल्यासोबत राहणार असतील, तर ते आपण जगलेले क्षण, दिलेले प्रेम, केलेली मदत आणि इतरांच्या मनात निर्माण केलेल्या आठवणी.

मग प्रश्न असा पडतो की, ज्या गोष्टी कायम आपल्या मालकीच्या राहणार नाहीत, त्यांच्यासाठी आपण आयुष्यभर स्वतःला इतके का झिजवतो? पैसा कमावणे चुकीचे नाही, मोठी स्वप्ने पाहणेही चुकीचे नाही; पण या सगळ्याच्या नादात स्वतःचे मानसिक स्वास्थ्य, कुटुंबाचा सहवास, मित्रांची मैत्री आणि छोट्या छोट्या आनंदांचा बळी देणे कितपत योग्य आहे?

मृत्यूला सोबत घेऊन जगणे म्हणजे मृत्यूची वाट पाहत बसणे नव्हे; तर प्रत्येक दिवस हा जगण्यासाठी मिळालेला अनमोल अवसर आहे, याची जाणीव ठेवणे होय. सकाळी डोळे उघडले, श्वास सुरू आहे, आपल्या माणसांचा सहवास लाभत आहे, निसर्गाचे सौंदर्य पाहता येत आहे, दोन घास अन्न मिळत आहे, मनापासून हसता येत आहे, या साध्या गोष्टीदेखील किती मौल्यवान आहेत, याचा विचार आपण किती वेळा करतो? ज्या गोष्टी रोज सहज मिळतात, त्यांचे महत्त्व आपण त्या हिरावल्या गेल्यानंतरच समजून घेतो.

आपल्याला वाटते की आनंद मिळवण्यासाठी मोठे घर हवे, भरपूर पैसा हवा, महागडी गाडी हवी, समाजात मोठे नाव हवे. पण आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यावर माणूस मागे वळून पाहतो, तेव्हा त्याला आठवतात ते केवळ यशाचे आकडे नाहीत. त्याला आठवतात कुटुंबासोबत घालवलेले क्षण, मित्रांसोबत केलेली धमाल, मुलांच्या चेहऱ्यावरील निरागस हास्य, आई-वडिलांशी मारलेल्या गप्पा आणि कोणीतरी अडचणीत असताना त्याला दिलेला आधार.

या आठवणींचे मूल्य कोणत्याही संपत्तीने मोजता येत नाही. मृत्यूचे भान आपल्याला नात्यांचे महत्त्वही शिकवते. एखाद्या व्यक्तीशी मतभेद झाले की आपण अनेकदा अहंकाराला महत्त्व देतो. बोलणे बंद करतो, मनात राग साठवतो, वर्षानुवर्षे नाती दुरावलेली ठेवतो. जणू आपल्याकडे अमर्याद वेळ आहे आणि कधीतरी सारे ठीक करता येईल, असे आपण समजतो. पण वेळेची हमी कोणाकडेच नाही. म्हणूनच शक्य असेल तेव्हा माफी मागावी, मनातले प्रेम व्यक्त करावे, गैरसमज दूर करावेत आणि नात्यांना पुन्हा एक संधी द्यावी.

आपल्या माणसांना प्रेम व्यक्त करण्यासाठी एखाद्या विशेष दिवसाची वाट पाहण्याची गरज नाही. आई-वडिलांना फोन करणे, मुलांसोबत थोडा वेळ घालवणे, जोडीदाराचे मनापासून कौतुक करणे किंवा मित्राची आस्थेने विचारपूस करणे, या छोट्या कृती जीवन समृद्ध करतात. उद्या संधी मिळेलच, या खात्रीवर आजचे प्रेम पुढे ढकलू नये.

मृत्यूचा विचार आपल्याला अहंकारापासूनही दूर नेतो. आज आपल्याकडे सत्ता असेल, पैसा असेल, अधिकार असेल किंवा आपल्या शब्दाला समाजात किंमत असेल; पण काळाच्या प्रवाहात या सगळ्यांचे महत्त्व बदलू शकते. कोणतेही पद कायमचे नसते, कोणतीही सत्ता शाश्वत नसते आणि कोणतेही यश अंतिम नसते. त्यामुळे दुसऱ्याला कमी लेखण्यात, कोणावर वर्चस्व गाजवण्यात किंवा स्वतःचे श्रेष्ठत्व सिद्ध करण्यात आयुष्य खर्च करण्यापेक्षा माणुसकी जपण्यात अधिक समाधान आहे.

आज समाजात वाढणारी अस्वस्थता पाहिली, तर माणूस जगण्यासाठी कमी आणि स्वतःला सिद्ध करण्यासाठी अधिक धावताना दिसतो. दुसऱ्याच्या यशाची तुलना स्वतःच्या आयुष्याशी केली जाते. कोणाकडे किती पैसा आहे, कोणाचे घर मोठे आहे, कोणाला किती प्रसिद्धी मिळाली, याचे हिशेब मांडले जातात. या तुलनेतून असमाधान वाढते. स्वतःकडे जे आहे, त्याचे समाधान हरवते.

मृत्यूचे भान मात्र एक साधा प्रश्न विचारायला शिकवते आपल्याला खरोखर काय हवे आहे? इतरांना प्रभावित करणारे आयुष्य की स्वतःला समाधान देणारे आयुष्य?

या प्रश्नाचे उत्तर प्रत्येकाने स्वतःच्या मनात शोधले पाहिजे. कारण आयुष्य किती मोठे आहे, यापेक्षा ते किती अर्थपूर्ण आहे, हे अधिक महत्त्वाचे आहे.

याचा अर्थ असा नाही की आपण भविष्याची चिंता करू नये, जबाबदाऱ्या टाळाव्यात किंवा आयुष्याचे नियोजन सोडून द्यावे. उलट मृत्यूचे भान आपल्याला अधिक जबाबदारीने जगायला शिकवते. आरोग्याची काळजी घ्यावी, कुटुंबाच्या भविष्याची तरतूद करावी, प्रामाणिकपणे काम करावे, चांगली स्वप्ने पाहावीत आणि ती पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत. पण या प्रयत्नांमध्ये वर्तमान हरवू देऊ नये. उद्याची तयारी करताना आजचा दिवस जगणे विसरू नये.

मृत्यू स्वीकारणे म्हणजे जीवनावर प्रेम करणे थांबवणे नव्हे. उलट जीवन मर्यादित आहे, याची जाणीव झाल्यावर प्रत्येक क्षण अधिक मौल्यवान वाटू लागतो. जसे एखाद्या सुंदर पुस्तकाची पाने मर्यादित आहेत, हे माहीत असल्यामुळे आपण ते अधिक लक्षपूर्वक वाचतो, तसेच आयुष्याचा प्रवासही मर्यादित आहे, हे समजल्यावर त्यातील प्रत्येक अनुभव मनापासून जगता येतो.

आपल्याला राग येईल, दुःख होईल, अपयश मिळेल, जवळची माणसे दुरावतील, कधी आर्थिक संकट येईल, तर कधी अपेक्षाभंग होईल. या सगळ्या गोष्टी जीवनाचा भाग आहेत. पण कोणतीही परिस्थिती कायमची नसते, ही जाणीव मनाला आधार देते. आजचा ग्रास उद्या कमी होऊ शकतो. आजचे अपयश उद्याच्या यशाची पायरी ठरू शकते. म्हणूनच आयुष्याच्या प्रत्येक कठीण प्रसंगाला अंतिम सत्य समजून खचून जाण्यापेक्षा त्यातून मार्ग शोधणे आवश्यक आहे.

त्याचबरोबर मृत्यूचे भान मनात निराशा किंवा सततची भीती निर्माण करत असेल, तर त्याचा अर्थ समजून घेणे गरजेचे आहे. मृत्यूची जाणीव ही जीवन अधिक चांगले जगण्यासाठी असावी, जीवनापासून दूर जाण्यासाठी नव्हे. प्रत्येक दिवसात काहीतरी अर्थ शोधणे, गरज पडल्यास मदत मागणे आणि आपल्या माणसांशी मन मोकळे करणे, हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

शेवटी, जन्म आपल्या हातात नव्हता आणि मृत्यूची नेमकी वेळही आपल्या हातात नाही. मात्र या दोन्हींच्या मधला जो प्रवास आहे, तो कसा जगायचा, यावर काही प्रमाणात आपले नियंत्रण आहे. हा प्रवास द्वेषात घालवायचा की प्रेमात, सततच्या चिंतेत घालवायचा की समाधानात, अहंकारात घालवायचा की माणुसकीत, हे आपण ठरवू शकतो. मृत्यू एक दिवस येणार आहे, म्हणून आज दुःखी होण्याचे कारण नाही. उलट तो येणार आहे, म्हणून आजचा दिवस आनंदाने जगण्याचे कारण आहे. उद्याची खात्री नसताना आजचे हास्य का रोखायचे? नाती जपता येत असताना अहंकार का जपायचा? मदत करता येत असताना हात मागे का घ्यायचा? मनात प्रेम असताना ते व्यक्त करण्यास संकोच का करायचा?

मृत्यू अटळ आहे; पण मृत्यूच्या भीतीत जगणे अटळ नाही.

म्हणून मृत्यूला शत्रू समजू नका, तर जीवनाचे मूल्य समजावून सांगणारा एक शांत शिक्षक समजा. त्याचे स्मरण आपल्याला प्रत्येक दिवसाचे महत्त्व शिकवते, प्रत्येक नात्याची किंमत समजावते आणि प्रत्येक क्षण मनापासून जगण्याची प्रेरणा देते.

कारण आयुष्याच्या अखेरीस आपण किती दिवस जगलो, यापेक्षा त्या दिवसांमध्ये किती प्रेम दिले, किती माणसे जोडली, किती दुःखी चेहऱ्यांवर हसू आणले आणि स्वतः किती मनापासून जगलो, याचे मोल अधिक असते. जन्म झाला आहे, म्हणून मृत्यूही होणार आहे हे सत्य स्वीकारा. मृत्यूला सोबत घेऊन जगा; पण प्रत्येक क्षण जीवनाच्या बाजूने उभे राहून जगा. कारण मृत्यू अटळ असला, तरी आयुष्य सुंदर बनवण्याची संधी आजही आपल्या हातात आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



ग्रामपंचायत गोपाळवाडीने दिव्यांगांची केली दिवाळी गोड, ५४००चे वाटप

दौंड (आरंभ पर्व) : दौंड तालुक्यातील ग्रामपंचायत गोपाळवाडी या ग्रामपंचायतीने पाच टक्के दिव्यांग निधी वाटप करण्यात आला, एकूण एकूण 51 लाभार्थ्यांना प्रत्येकी 5400 चा चेक मान्यवरांच्या हस्ते देण्यात आला, एकूण दोन लाख 75 हजार दोनशे रुपये वाटप करण्यात आले, दिवाळीच्या आधी लाभार्थ्यांना चेक मिळाल्याने दिव्यांगांची दिवाळी गोड व्हायला हातभार लागला असंच म्हणावं लागेल, यावेळी ग्रामपंचायत अधिकारी झुंबर होळकर, माजी सरपंच स्वातीताई पवार, मा.चेअरमन भीमराव होले, दिव्यांग प्रतिनिधी ईश्वर जाधव आदीसह ग्रामस्थ व लाभार्थी यावेळी उपस्थित होते, यावेळी अपंग सेलचे गोपाळवाडी शाखाध्यक्ष ईश्वर जाधव म्हणाले की, ग्रामपंचायतने दिव्यांगाना प्रत्येक वर्षी याच प्रमाणे चेक वाटप केले जाते परंतु यावेळी दिवाळीच्या तोंडावर चेक मिळाल्याने आम्हा दिवंगांची दिवाळी चांगल्या पद्धतीने साजरी होणार आहे, आम्ही सर्व दिव्यांग बांधवांच्या वतीने ग्रामपंचायतीचे आभार मानत आहोत.

वळसे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन



मंचर (आरंभ पर्व) : दत्तात्रयनगर, पारगाव तर्फे अवसरी बु, (ता. आंबेगाव) येथील भीमाशंकर सहकारी साखर कारखाना येथे शुक्रवार (ता. ३०) कारखान्याचे संस्थापक-संचालक व महाराष्ट्र राज्याचे माजी सहकार मंत्री मा.आ.श्री. दिलीपराव वळसे पाटील यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त कारखाना कार्यस्थळावर सकाळी ठिक १०.०० वाजता भीमाशंकर साखर कारखाना व भीमाशंकर शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने शिवनेरी ब्लड सेंटर, मंचर यांचेमार्फत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन केले असल्याची माहीती कारखान्याचे चेअरमन बाळासाहेब बेंडे यांनी दिली. सद्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्य नागरिकांसमोर विविध अडचणी उभ्या राहत आहेत. अशा परिस्थितीत समाजाप्रती आपली जबाबदारी ओळखून व रक्तदान हे जीवनदान असून गरजू रूग्णांना रक्त उपलब्ध व्हावे आणि रक्ताची गरज असणा-या गरजूंना रक्त वेळेत उपलब्ध व्हावे हा मुख्य उद्देश आहे. वाढदिवसानिमित्त केक, हारतुरे, फटाके बॅनरवर अनावश्यक खर्च करण्यापेक्षा दुष्काळग्रस्त कुटुंबाच्या मदतीसाठी, गरजू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक साहित्यासाठी, पाणीटंचाई निवारणासाठी प्रयत्न करावेत. तसेच या उपक्रमाच्या माध्यमातून समाजातील तरुणांनी, नागरीकांनी व रक्तदात्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होवून सामाजिक कार्यात आपले योगदान द्यावे असे आवाहन कारखान्याचे व्हाईस चेअरमन प्रदीप वळसे पाटील यांनी केले.

फलटण येथे ३ नोव्हेंबरला श्री चक्रपाणि प्रभू अवतार दिन सोहळा

उरुळी कांचन (आरंभ पर्व) : अखिल मानवमात्राच्या उद्धारासाठी अवतरित झालेले पूर्ण परब्रह्म परमेश्वर श्री चक्रपाणि प्रभू यांच्या अवतार दिनानिमित्त मंगळवार, दि. ३ नोव्हेंबर २०२६ रोजी श्रीक्षेत्र फलटण येथे भव्य धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. श्रीकृष्ण देवस्थान ट्रस्ट, फलटण आणि आचार्य प्रवर प.पू.प.म. श्री. मुकुंदराज बाबा बिडकर यांच्या वतीने, सातारा जिल्हा महानुभाव परिषदेच्या सहभागातून हा सोहळा पार पडणार आहे. या निमित्ताने पहाटे ५ वाजता श्री चक्रपाणि प्रभू जन्मस्थान मंदिर, फलटण येथे जन्मकाळाचा कार्यक्रम होईल. सकाळी ६ वाजता श्री चक्रपाणि महानुभाव मठ येथे जन्मकाळ, सकाळी ८ वाजता श्री चक्रपाणि स्तोत्र पारायण, सकाळी ९ वाजता ध्वजारोहण आणि सकाळी १० वाजता धर्मसभा आयोजित करण्यात आली आहे.

पश्चिम हवेली तालुक्यातील गावे दुष्काळ ग्रस्त गावे म्हणून जाहीर करावीत

- शिवसेनेची मागणी

पुणे (दै. आरंभ पर्व)

राज्य सरकारने राज्यातील काही तालुके दुष्काळग्रस्त तालुके म्हणून घोषित केले आहेत. यामध्ये पुणे जिल्ह्यातील देखील काही तालुक्यांचा समावेश आहे. परंतु या यादीतून हवेली तालुका वगळण्यात आला आहे. पश्चिम हवेलीच्या सीमेला लागून असलेले भोर आणि राजगड हे दोन तालुके या यादीत समाविष्ट आहेत. या भागात चार धरणे येतात. यापैकी खडकवासला धरण परिसरात यावर्षी झालेला पाऊस हा पानशेत आणि वरसगाव या धरण परिसरात झालेल्या पाऊसापेक्षा कमी आहे. हि दोन्ही धरणे राजगड तालुक्यात येतात. हवेली आणि राजगड तालुक्यातील गावे एकमेकाला लागून आहेत. गावाशेजारील गाव दुष्काळग्रस्त जाहीर होते आणि हवेली तालुक्यामुळे दुसरे गाव होत नाही हि विसंगती आहे. एक हि परिस्थिती शासनाचे निदर्शनात आणून द्यावी आणि पश्चिम हवेली तालुक्यातील सर्व गावे दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर करण्याची शिफारस करावी अशी मागणी शिवसेनेच्या वतीने मा. पंचायत समिती सदस्य नितीन वाघ, रामदास गायकवाड, अरुण घोगरे, पप्पू गायकवाड, सागर शिर्के, सौरभ मोकाशी, गुरुदत्त हगवणे, चेतन पायगुडे, अजित पायगुडे, आकाश डिंबळे यांनी हवेली तहसीलदार अर्चना निकम यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

शिक्षक हा शिक्षणव्यवस्थेचा कणा : प्रितीताई थोरात

घोडेगाव (दै. आरंभ पर्व)



शिक्षक हा शिक्षणव्यवस्थेचा कणा आहे असे प्रतिपादन पुणे जिल्हा परिषद सदस्या माननीयप्रिती ताई प्रविणशेठ थोरात यांनी केले.फुलेवाडी महाळुंगे पडवळ येथे आयोजित केंद्र स्तरीय विशेष शिक्षण परिषदेत त्या बोलत होत्या शिक्षक जीव तोडून गुणवत्ता टिकविण्याचे काम करतात मुलांना घडवतात म्हणून जिल्हा परिषद शाळेत जगण्यासाठी आवश्यक शिक्षण मिळते व पिढी घडते असे त्या पुढे म्हणाल्या. यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख माननीय प्रविणशेठ थोरात, साकोरे केंद्राच्या आदर्श केंद्रप्रमुख माननीय स्मिता चासकर मॅडम, शालेय व्यवस्थापन समिती फुलेवाडी अध्यक्ष माननीय सुनीता अनंता बनकर, उपाध्यक्ष माननीय राजेंद्र अरुण डोके, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य माननीय मोनालीताई बनकर, अनंता बनकर, आंबेगाव तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था उपसभापती माननीय सोपानराव सैद, विशेष शिक्षिका प्रतिभा पडवळ साकोरे केंद्रातील सर्व शिक्षकबंधू भगिनी उपस्थित होते . मूल्यवर्धन उपक्रम प्रभावी पणेराबविण्यासाठी या परिषदेत शिक्षकांचे उद्बोधन करण्यात आले. मूल्य वर्धन उपक्रम मुलांच्या मूल्यशिक्षणासाठी महत्त्वाचा असून शिक्षकांनी त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी असे आवाहन स्मिता चासकर मॅडम यांनी केले. साकोरे केंद्रातील उल्लेखनीय बाबी व शिक्षक करत असलेले प्रयत्न निश्चित कौतुकास्पद आहेत असे त्या म्हणाल्या. शालेय व्यवस्थापन समिती फुलेवाडी अध्यक्ष सुनीता बनकर, उपाध्यक्ष राजेंद्र अरुण डोके, मोनालीताई बनकर, अनंता बनकर यांनी फुलेवाडी शाळेतील समस्या दूर करण्यासाठी उपाययोजना करण्याची विनंती प्रितीताई थोरात व प्रविणेशेठ थोरात यांना करण्यात आली. कथाकथन स्पर्धेत प्रथम क्रमांक आल्याबद्दल मधुरा वैष्णव, पोस्टर निर्मिती स्पर्धेत द्वितीय क्रमांक आल्याबद्दल आत्माराम जगदाळे, कथालेखन स्पर्धेसाठी उज्ज्वला हुले यांचा सत्कार करण्यात आला शाळेला तीन वर्षे सतत पाणीपुरवठा करणारे सचिन बनकर यांचाही सत्कार करण्यात आला मार्गदर्शक म्हणून पंढरीनाथ सैद यांनी काम पाहिले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक नंदकुमार फुलचंद येवले व आभार आनंद नारायण संत यांनी मानले संयोजन प्रतिक्षा ताजने व ललिता डोके यांनी केले.

घोडेगाव–भीमाशंकर रस्त्यावर इको वाहनाचा भीषण अपघात

- तिघांचा मृत्यू; तिघे गंभीर जखमी
- रस्त्यावरील खड्डे चुकविताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले
- आंबेगाव तालुक्यात हळहळ



आंबेगाव (दै. आरंभ पर्व)

पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यात घोडेगाव-भीमाशंकर रस्त्यावरील पोखरी घाट परिसरात इको या प्रवासी वाहतूक करणाऱ्या चारचाकी वाहनाचा भीषण अपघात झाला. रस्त्यावरील खड्डे चुकविण्याच्या प्रयत्नात चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती आहे. या दुर्घटनेत दोघांचा मृत्यू झाला असून, अन्य चार जण गंभीर जखमी झाल्याचे समजते. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, घोडेगाव-भीमाशंकर मार्गावरून इको वाहन प्रवाशांना घेऊन जात असताना पोखरी घाट परिसरात रस्त्यावरील खड्डे चुकविण्याचा प्रयत्न चालकाने केला. यावेळी वाहनावरील ताबा सुटल्याने अपघात घडल्याचे सांगण्यात येत आहे. अपघाताची तीव्रता लक्षात घेता परिसरात चिंता व्यक्त होत असून, जखमींवर उपचार सुरू असल्याची प्राथमिक माहिती आहे. या अपघाताच्या पार्श्वभूमीवर घोडेगाव-भीमाशंकर रस्त्यावरील खड्ड्यांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. रस्त्यावरील खड्ड्यांमुळे वाहनचालकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे सांगितले जात आहे. विशेषतः घाटमार्गावर खड्डे चुकविताना वाहनावरील नियंत्रण सुटण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे संबंधित विभागाने रस्त्याची तातडीने पाहणी करून खड्डे बुजवावेत आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होण्याची शक्यता आहे. दरम्यान, अपघातातील मृतांची ओळख, जखमींची प्रकृती आणि घटनेबाबतची अधिकृत माहिती अद्याप स्पष्ट झालेली नाही. संबंधित यंत्रणांकडून अधिकृत तपशील उपलब्ध झाल्यानंतर अपघाताचे नेमके स्वरूप स्पष्ट होणार आहे.

ओप्पो फाइंड एक्स १० सिरीज सादर

पुणे (दै. आरंभ पर्व)



ओप्पो इंडियाने नवीन ओप्पो फाइंड एक्स १० सिरीज सादर केली आहे. या सिरीजमध्ये ओप्पो फाइंड एक्स १० आणि ओप्पो फाइंड एक्स १० प्रो मॅक्स या दोन स्मार्टफोनचा समावेश आहे. ओप्पोच्या नाविन्यपूर्ण आणि प्रीमियम फाइंड एक्स सिरीजची ही दहावी पिढी आहे. प्रीमियम स्मार्टफोनचा अनुभव आणखी चांगला करण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आला आहे. या सिरीजमध्ये प्रत्यक्ष दृश्यांप्रमाणे स्पष्ट फोटो काढण्याचे प्रगत तंत्रज्ञान, दमदार कामगिरी, दीर्घकाळ टिकणारी बॅटरी आणि आकर्षक डिझाइन यांचा समावेश आहे. यासोबतच, नवीन कलरओएस देण्यात आले आहे, ज्यामुळे फोन वापरण्याचा अनुभव अधिक सहज आणि सुरळीत होणार आहे.ओप्पोने आपल्या प्रीमियम उपकरणांच्या मालिकेचा विस्तार करत ओप्पो एन्को एक्स ४ आणि ओप्पो पॅड मिनी ही दोन नवीन उत्पादनेही सादर केली आहेत.

कागदपत्रांअभावी एकही मूल शाळाबाह्य होता कामा नये

पुणे महानगरपालिकेने ठोस भूमिका घ्यावी – बालहक्क कृती समितीची मागणी



पुणे (दै. आरंभ पर्व)

आधार कार्ड आणि जन्मदाखला नसल्यामुळे मुलांना शाळेत प्रवेश मिळवताना तसेच थेट लाभ हस्तांतरण (डीबिटि) योजनेचे लाभ मिळवताना अडचणी येत आहेत. कागदपत्रांअभावी कोणतेही मूल शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी पुणे महानगरपालिकेने ठोस भूमिका घेऊन संबंधित मुलांना आवश्यक कागदपत्रे मिळवून देण्यासाठी मदत करावी, अशी मागणी बालहक्क कृती समितीच्या वतीने करण्यात आली. बाळासाहेब ठाकरे सभागृह सारसबाग येथे बालहक्क कृती समितीच्या पुढाकाराने शाळाबाह्य मुले, मनपा शाळांमध्ये प्रवेश घेताना येणाऱ्या अडचणी, शाळा गळती रोखण्याची आव्हाने आणि शाळा व्यवस्थापन समितीच्या नवीन मार्गदर्शक तत्त्वांवर विशेष परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. या परिसंवादाला पुणे शहरातील विविध वस्त्यांमधील पालक आणि बालहक्क क्षेत्रात कार्यरत सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. बालहक्क कृती समिती हे बालहक्कांच्या संरक्षणासाठी कार्यरत सामाजिक संस्था आणि कार्यकर्त्यांचे नेटवर्क आहे. या परिसंवादाच्या माध्यमातून मुलांच्या शिक्षणातील अडथळे समजून घेणे, पालकांचे अनुभव जाणून घेणे आणि प्रशासन व सामाजिक संस्थांच्या समन्वयातून उपाययोजना शोधणे हा उद्देश होता. परिसंवादात बालहक्क कृती समितीचे मंदार शिंदे यांनी शासनाच्या नवीन शाळा व्यवस्थापन समिती मार्गदर्शक तत्त्वांविषयी मार्गदर्शन केले. शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे, शाळा गळती रोखणे आणि शाळांमध्ये पालकांचा सहभाग वाढवणे यासाठी शाळा व्यवस्थापन समित्यांची भूमिका महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले. नवीन मार्गदर्शक तत्त्वांनुसार इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतच्या शाळांमध्ये शाळा व्यवस्थापन समित्यांच्या स्थापनेवर भर देण्यात आला आहे. शिक्षण व्यवस्थेतील गळतीचे प्रमाण आणि शाळांच्या उपलब्धतेतील तफावत याकडेही परिसंवादात लक्ष वेधण्यात आले. शासनाच्या शैक्षणिक आकडेवारीनुसार, इयत्ता पहिलीमध्ये प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक १०० विद्यार्थ्यांपैकी ७९ विद्यार्थीच इयत्ता आठवीपर्यंत, तर ५६ विद्यार्थी इयत्ता अकरावी - बारावीपर्यंत पोहोचतात, अशी आकडेवारी चर्चेत मांडण्यात आली.

दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
गुरुवार, दि. २९ ऑक्टोबर २०२६
३



थोडक्यात पण महत्वाचे



भीषण आगीत दोन घरे खाक; धान्यासह दागदागिणे भस्मसात

राजगुरूनगर (आरंभ पर्व) : खेड तालुक्याच्या पश्चिम भागातील हेद्रुजची पवारवाडी येथील ठाकरवस्तीमध्ये लागलेल्या भीषण आगीत दोन घरे खाक झाली. शिवाजी बुधा केदारी आणि सोपान बुधा केदारी या दोन्ही भावांच्या कुटुंबांचे या दुर्घटनेत मोठे नुकसान झाले असून अडीच ते तीन तोळे सोने, एक लाख ९० हजार रुपये रोख, इलेक्ट्रिक मोटर, ज्वारीची १२ पोती, तांदळाची सहा पोती, कडधान्य, कपडे आणि इतर संसारोपयोगी चीजवस्तू आगीत जळाल्या. आगीचे कारण समजू शकले नाही. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरीकांनी प्रशासकीय यंत्रणेशी संपर्क साधून तातडीने पंचनामे करण्याची मागणी केली. प्रांताधिकारी अनिल दौंडे, तहसीलदार प्रशांत बेडसे आणि पोलिस प्रशासनाला घटनेची माहिती दिली. जळीतग्रस्त कुटुंबांना शासकीय मदत मिळावी आणि तातडीने घरकुल मंजूर करावे, अशी मागणीही ग्रामस्थांनी केली. दोन्ही कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंच्या किटसह ब्लँकेट, चटई, किराणा साहित्य आणि इतर आवश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले.

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर दवाखान्यात मोफत आरोग्य सुविधा

- नागरिकांना व्हॉट्सअॅप ग्रुपमध्ये सहभागी होण्याचे आवाहन

जुन्नर शहर (आरंभ पर्व) : जुन्नर शहरातील शुक्रवार पेठ, शाळा क्रमांक ४ येथे सुरू असलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर आपला दवाखाना' येथे नागरिकांना विविध आरोग्य सुविधा मोफत उपलब्ध करून देण्यात येत आहेत. या सुविधांची माहिती शहरातील प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचावी, या उद्देशाने दवाखान्याच्या वतीने नवीन व्हॉट्सअॅप ग्रुप तयार करण्यात आला आहे. या व्हॉट्सअॅप ग्रुपच्या माध्यमातून दवाखान्यात उपलब्ध असलेल्या मोफत आरोग्य सेवा, विविध वैद्यकीय तपासण्या, आरोग्य शिबिरे, औषधोपचार तसेच आरोग्यविषयक महत्त्वाच्या सूचना नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहेत. त्यामुळे नागरिकांना दवाखान्यातील आरोग्य सुविधांची माहिती वेळेवर मिळण्यास मदत होणार आहे. अनेकदा आरोग्य सुविधांची माहिती नसल्यामुळे नागरिकांना उपलब्ध सेवांचा लाभ घेता येत नाही. ही बाब लक्षात घेऊन मोफत आरोग्य सेवांची माहिती अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या ग्रुपमध्ये सहभागी होऊन नागरिकांनी स्वतःसह आपल्या कुटुंबातील सदस्यांना आणि परिसरातील गरजू व्यक्तींनाही या सुविधांची माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. 'आरोग्याची काळजी, प्रत्येकाची जबाबदारी' हा संदेश देत, सर्वसामान्य नागरिकांना मोफत आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच त्यांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविणेही महत्त्वाचे आहे. त्यामुळे जुन्नर शहरातील नागरिकांनी या व्हॉट्सअॅप ग्रुपमध्ये सहभागी होऊन आरोग्यविषयक माहितीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. सेवा मोफत, सुविधा सर्वांसाठी! या उद्देशाने नागरिकांनी या उपक्रमात सहभागी होऊन मोफत आरोग्य सेवांची माहिती इतरांपर्यंत पोहोचवावी.

'पीसीईआरएफ'च्या मानद सचिवपदी इंजि. रामनाथ भट यांची नियुक्ती



पुणे (आरंभ पर्व) : इंजि. रामनाथ भट यांची पुणे कन्स्ट्रक्शन इंजिनिअर्स अँड रिसर्च फाउंडेशनच्या मानद सचिवपदी नियुक्ती करण्यात आली. फाउंडेशनचे मावळते मानद सचिव आर्किटेक्ट शिरीष केंभावी यांनी इंजि. रामनाथ भट यांच्याकडे मानद सचिव पदाचा औपचारिक कार्यभार सुपूर्द केला. फाऊंडेशनच्या कार्यकारी समितीच्या बैठकीत ही नियुक्ती करण्यात आली. बैठकीला पुणे कन्स्ट्रक्शन इंजिनिअर्स अँड रिसर्च फाउंडेशनचे अध्यक्ष इंजि. नरेंद्र कोठारी, उपाध्यक्ष इंजि. जयंत इनामदार आणि इंजि. संजय वायचळ, मानद खजिनदार इंजि. जयदीप राजे, तसेच कार्यकारी समितीचे इतर सदस्य उपस्थित होते. १९८३ मध्ये स्थापन झालेली पुणे कन्स्ट्रक्शन इंजिनिअरिंग रिसर्च फाउंडेशन ही संस्था बांधकाम आणि बांधकाम संबंधित क्षेत्रांच्या प्रगतीसाठी सातत्याने कार्यरत आहे. संशोधन व नवोपक्रम, तांत्रिक प्रशिक्षण व कौशल्य विकास, बांधकाम सुरक्षा, विद्यार्थी विकास तसेच उद्योग आणि शैक्षणिक संस्थांमधील सहकार्य या क्षेत्रांत संस्था विविध उपक्रम राबवते. बांधकाम क्षेत्राची सर्वांगीण प्रगती, ज्ञानवृद्धी यांसाठी संस्था सातत्याने काम करते.

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त भीम सृष्टीत महामानवाला

अभिवादन करण्यासाठी उसळला भीमसागर!

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यासाठी अनुयायांची मोठी गर्दी

पिंपरीतील भीम सृष्टी परिसरात अभिवादनासाठी जमलेला भीमसागर आणि जय भीमच्या घोषणांनी भीम सृष्टी परिसरात सामाजिक एकतेचे दर्शन घडले महामानवाच्या विचारांना अभिवादन करत नागरिकांनी मोठ्या उत्साहाने धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात साजरा केला.

पिंपरी (दै. आरंभ पर्व)

भारतीय संविधानाचे शिल्पकार, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ दरवर्षी अशोका विजयादशमीच्या दिवशी विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर व त्यागमुर्ती माता रमाई स्मारक समिती पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने ७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त पिंपरीत भीम सृष्टी येथे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यासाठी भीम अनुयायांचा मोठा जनसागर उसळला. डॉ.



बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना अभिवादन करण्यासाठी पिंपरी शहरातील खराळवाडी मोरवाडी लालटोपीनगर डिलक्स चौक वैशालीनगर नानेकरचाळ रमाबाईनगर वल्लभनगर संततुकारामनगर नेहरूनगर कासारवाडी फुगेवाडी दापोडी चिंचवड मोहनगर अशा विविध भागांतून नागरिकांनी गर्दी केली. 'जय भीम', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो' अशा घोषणांनी भीम सृष्टी परिसर दुमदुमून गेला. धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त पिंपरी परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी सकाळपासूनच अनुयायांची वर्दळ सुरू झाली होती. महिला, पुरुष, युवक, ज्येष्ठ नागरिक तसेच लहान मुलांनीही मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. हातामध्ये निळे झेंडे, निळ्या टोप्या आणि महामानवाच्या विचारांचा जागर करणाऱ्या घोषणांमुळे भीम सृष्टी परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्यायाचा संदेश आजही समाजाला प्रेरणा देत आहे. अंधश्रद्धा, विषमता आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा त्यांच्या विचारांतून मिळते. धम्मचक्र प्रवर्तन दिन हा केवळ उत्सव नसून सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीची आठवण करून देणारा ऐतिहासिक दिवस आहे, अशी भावना यावेळी अनेक अनुयायांनी व्यक्त केली.

बाबासाहेबांच्या विचारांचा जागर

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त अभिवादना सोबतच सामाजिक समतेचा संदेश देण्यात आला. शिक्षण, संघटन आणि संघर्ष या विचारांचा अंगीकार करून समाजातील प्रत्येक घटकाला समान संधी मिळावी, यासाठी प्रयत्न करण्याचा निर्धार अनुयायांनी व्यक्त केला. बाबासाहेबांनी दाखविलेल्या मार्गावर चालत संविधानिक मूल्यांचे जतन करणे हीच त्यांना खरी आदरांजली असल्याची भावना यावेळी व्यक्त होत होती.

अप्पूघरमध्ये ४९ झाडांची कत्तल

- ठेकेदारावर गुन्हा दाखल करण्याची आपची मागणी
- १३ झाडांच्या छाटणीची परवानगी

पिंपरी (दै. आरंभ पर्व)

निगडी येथील पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मालकीच्या अप्पूघर परिसरात विनापरवाना ४९ झाडांची कत्तल केल्याचा आरोप आम आदमी पार्टीने केला आहे. या प्रकरणी संबंधित खासगी ठेकेदारावर गुन्हा दाखल करून त्याचा करार रद्द करावा, तसेच संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करावी, अशी मागणी पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांना निवेदन देण्यात आले. आम आदमी पार्टीने दिलेल्या निवेदनानुसार, अप्पूघर चालविणाऱ्या खासगी ठेकेदाराला महापालिकेच्या उद्यान व वृक्ष संवर्धन विभागाकडून केवळ १३ झाडांच्या छाटणीसाठी परवानगी देण्यात आली होती. मात्र, प्रत्यक्षात ४९ झाडे खोडापासून तोडण्यात आल्याचा आरोप पक्षाने केला आहे. त्यामुळे मंजूर परवानगीच्या



मर्यादेचे उल्लंघन झाल्याचा दावा करण्यात आला आहे.

महापालिकेच्या मालकीच्या जागेतच असा प्रकार घडल्याने वृक्ष संवर्धन विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असल्याचे पक्षाने निवेदनात म्हटले आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. ठेकेदारावर महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम, १९७५ तसेच लागू पर्यावरणविषयक कायद्यांनुसार गुन्हा दाखल करावा आणि त्याचा करार तातडीने रद्द करावा, अशी मागणी आम आदमी पार्टीने केली आहे. या प्रकरणात दुर्लक्ष करणाऱ्या किंवा जबाबदारी पार न पाडणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची चौकशी करून दोषी आढळल्यास निलंबनाची कारवाई करावी, अशी भूमिकाही पक्षाने मांडली आहे. तोडण्यात आलेल्या झाडांच्या बदल्यात तिप्पट संख्येने देशी प्रजातींची झाडे लावावीत आणि त्यांचे संगोपन करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित ठेकेदारावर सोपवावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.

या प्रकरणात सात दिवसांच्या आत ठोस कारवाई न झाल्यास पिंपरी-चिंचवड महापालिकेसमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा आम आदमी पार्टीने दिला आहे. यावेळी आम आदमी पार्टीचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष वैजनाथ शिरसाट, आप रिक्षा संघटनेचे अध्यक्ष अंगद मुगळे, आप नेत्या कविता कोंडे देशमुख उपस्थित होते.

मतपत्रिकेवरील जनमतातून सत्ताधाऱ्यांना संदेश

- जनतेचा विश्वासच सर्वात मोठी ताकद
- पक्षफोडीच्या राजकारणावर श्रीकांत पाटील यांची टीका
- आगामी निवडणुका मतपत्रिकेवर घेण्याची मागणी

पुणे (दै. आरंभ पर्व)

पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय घडामोडी आणि सत्ताधाऱ्यांविषयी जनमानसात असलेल्या भावनांची चर्चा सुरू झाली आहे. पक्षफोडीचे राजकारण, आमदारांची पळवापळवी आणि सत्तेसाठी कोणत्याही थराला जाण्याच्या प्रवृत्तीमुळे लोकशाही मूल्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याची टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पुणे पूर्व शहराध्यक्ष श्रीकांत पाटील यांनी केली. लोकशाही व्यवस्थेत जनतेचा आवाज किती काळ दुर्लक्षित केला जाणार, असा सवाल उपस्थित करताना पाटील यांनी भारतीय जनता पक्षाच्या राजकीय कार्यपद्धतीवरही टीका केली. सत्तेचा वापर करून विरोधकांना कमकुवत करण्याचे राजकारण आणि लोकशाही संस्थांवर वर्चस्व प्रस्थापित करण्याची प्रवृत्ती जनतेने किती काळ सहन करायची, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरदचंद्र पवार यांनी आपल्या प्रदीर्घ राजकीय कारकिर्दीत समाजातील विविध घटकांच्या प्रश्नांना प्राधान्य दिले.

ग्रामपंचायत गार, ता. दौंड, जि. पुणे

बी-१ पेपर नोटीस क्रमांक-१ सन २०२६-२७

ग्रामपंचायत गार, ता. दौंड, जि.पुणे यांचेकडून खालील नमूद केलेल्या कामांची निविदा बी १ निविदा पद्धतीने (दोन सिलबंद लिफाफा पद्धतीने) जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निविदेचा नमुना ग्रामपंचायत गार, ता. दौंड, जि. पुणे यांच्याकडून दिनांक २९/१०/२०२६ ते दिनांक ०४/११/२०२६ या कालावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यंत देण्यात येतील व दिनांक २९/१०/२०२६ ते दिनांक ०४/११/२०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यंत पोस्टाने / समक्ष ग्रामपंचायत मध्ये स्विकारले जातील. सदर सिलबंद निविदा मासिक सभे दिवशी/ग्रामपंचायत सोईनुसार उघडण्यात येतील.

अ. क्र.	कामाच नाव	अंदाजपत्रकिय रक्कम	निविदा विक्री करण्याचा कालावधी	निविदा फी	इसारा रक्कम
१)	मौजे नवीन गार/होलेमळा अंगणवाडी केंद्र शौचालय दुरुस्ती करणे	१५२६५८/-	दिनांक २९/१०/२०२६ ते दिनांक ०४/११/२०२६	२३०/-	सूट सु.बे.अ.
२)	नवीन गार माऊली मंदिर घाडगे वस्ती पेवर ब्लॉक बसविणे	१०००००/-		२३०/-	सूट सु.बे.अ.
३)	नवीन गार रोहिदास नगर बंदिस्त गटर करणे	१७३६४६/-		२३०/-	सूट सु.बे.अ.
४)	जुनी गार अंतर्गत बंदिस्त गटर करणे	१७३७५९/-		२३०/-	सूट सु.बे.अ.
५)	येडेवस्ती अंतर्गत बंदिस्त गटर करणे	१७३७५९/-		२३०/-	सूट सु.बे.अ.
६)	मरळवस्ती अंतर्गत बंदिस्त गटर करणे	१७३७५९/-		२३०/-	सूट सु.बे.अ.
७)	बेटवाडी अंतर्गत होलेमळा बंदिस्त गटर करणे	१७३६४६/-		२३०/-	सूट सु.बे.अ.
८)	धावडेवस्ती अंगणवाडी केंद्र बोरवेल घेणे व मोटर बसविणे	१८२७०६/-		२३०/-	खुला १८२७/-
९)	नवीन गार प्राथमिक आरोग्य केंद्र बोरवेल घेणे व मोटर बसविणे	९९८१४/-		२३०/-	खुला ९९८/-
१०)	जुनी गार अंतर्गत रस्ता कॉन्क्रीट करणे	२००००/-		२३०/-	खुला २०००/-
११)	नवीन गार माऊली मंदिर घाडगे वस्ती पेवर ब्लॉक बसविणे २	१०००००/-		२३०/-	खुला १०००/-
१२)	नवीन गार रोहिदास नगर सभामंडप परिसर पेवर ब्लॉक बसविणे	२३८१४७/-		२३०/-	खुला २३८१/-
१३)	नवीन गार दलितवस्ती न.पा.पु. विहीर खोलीकरण व दुरुस्ती करणे	२३७३९१/-		२३०/-	खुला २३७३/-
१४)	बेटवाडी प्राथमिक आरोग्य केंद्र दुरुस्ती करणे	१००००/-		२३०/-	खुला १०००/-

निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे : १) कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारणे चा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. २) कोऱ्या निविदा फी ग्रामपंचायत गार PDCC बँक दौंड शाखा खाते क्र. ००३००२५०००००००४५ वर किंवा ग्रा.प. कार्यालयात रोख भरल्यानंतर उपलब्ध होतील. तसेच निविदा भरणे कमी आवश्यक अटी व शर्ती सोबत दिल्या जातील. ३) यापूर्वी केलेल्या कामांचे पूर्णत्वाचे दाखले जोडावेत. ४) इसारा रक्कम ग्रामपंचायत गार ग्रामनिधी खाते PDCC बँक दौंड शाखा खाते क्र. ००३००२५०००००००४५ च्या खाती भरल्याची पावती जोडण्यात यावी किंवा ग्रामपंचायत नावे धनादेश/डी.डी. जोडण्यात यावा. तसे न केल्यास आपल्या निविदेचा विचार केला जाणार नाही. ५) आपण तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा वेगवेगळा सादर करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा प्रथम उघडण्यात येईल आपण सर्व नियमास पात्र झाल्यानंतर आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल. सदर निविदा बाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करणेचा, कोणतीही निविदा स्वीकारणेचा अथवा नाकारणेचा सर्व अधिकार ग्रामपंचायत गार यांनी राखून ठेवला आहे.

ग्रामपंचायत अधिकारी प्रशासक
ग्रामपंचायत गार, ता. दौंड, जि. पुणे

पुरंदरमध्ये सीताफळाच्या बागा करपू लागल्या

शेतकरी चिंतेत : पाण्याची टंचाई, झाडांची पिवळी पडणारी पाने आणि उत्पादन घटण्याची भीती; बागा जगविण्यासाठी शेतकऱ्यांची धडपड

नारायणपूर (अमित सांबरे) (दै. आरंभ पर्व)

नारायणपूर, ता. पुरंदर : पुरंदर तालुक्यात पावसाळ्यात अपेक्षित पाऊस न झाल्याने आणि पाण्याची उपलब्धता कमी झाल्याने सीताफळ उत्पादक शेतकरी अडचणीत सापडले आहेत. पाण्याअभावी सीताफळाच्या बागांमधील झाडांची पाने पिवळी पडून वाळू लागली असून, काही झाडे करपण्याच्या स्थितीत आहेत. त्यामुळे बागा जगविण्याचे मोठे आव्हान शेतकऱ्यांसमोर उभे राहिले असून, आगामी उत्पादनावर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. पुरंदर तालुक्यातील अनेक शेतकरी सीताफळ लागवडीकडे उत्पन्नाचे महत्त्वाचे साधन म्हणून पाहतात. बागांची लागवड, मशागत, खते, औषधे आणि देखभालीसाठी शेतकऱ्यांनी मोठा खर्च केला आहे. मात्र, पावसाने ओढ दिल्याने जमिनीतील ओलावा कमी झाला असून, पिकांना आवश्यक



पाणी मिळणे कठीण बनले आहे. परिणामी सीताफळाच्या झाडांवर पाण्याच्या ताणाची लक्षणे दिसू लागली आहेत.

सीताफळाच्या झाडांची पाने पिवळी पडणे, सुकणे आणि फांद्यांवरील हिरवळ कमी होणे, अशी परिस्थिती काही बागांमध्ये दिसत आहे. पाण्याची कमतरता कायम राहिल्यास फळांचा आकार, गुणवत्ता आणि उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या अपेक्षित उत्पन्नावर पाणी फिरण्याची भीती निर्माण झाली आहे.

पाण्याची टंचाई जाणवू लागल्याने सीताफळाच्या बागा वाचविण्यासाठी शेतकऱ्यांना उपलब्ध विहिरी, बोअरवेल आणि इतर जलस्रोतांवर अवलंबून राहावे लागत आहे. काही ठिकाणी सिंचनासाठी पाणी मिळविताना अतिरिक्त खर्च करावा लागत असल्याने शेतकऱ्यांवरील आर्थिक भार वाढत आहे. एकीकडे बागा वाळण्याची भीती, तर दुसरीकडे त्या जगविण्यासाठी करावी लागणारी धडपड, अशा दुहेरी संकटाचा सामना उत्पादकांना करावा लागत आहे. सीताफळाची बाग तयार करण्यासाठी अनेक वर्षे मेहनत आणि गुंतवणूक करावी लागते. त्यामुळे झाडांचे नुकसान झाल्यास केवळ चालू हंगामातील उत्पादनच नव्हे, तर भविष्यातील उत्पन्नावरही परिणाम होऊ शकतो. यामुळे बागायतदारांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. पुरंदर तालुक्यातील सीताफळ उत्पादकांसाठी पाण्याची उपलब्धता हा सध्या महत्त्वाचा प्रश्न बनला आहे. पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी वेळेत उपाययोजना झाल्या नाहीत, तर बागांचे नुकसान वाढण्याची आणि उत्पादन घटण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासन व कृषी विभागाने परिस्थितीची गांभीर्याने दखल घेऊन शेतकऱ्यांना आवश्यक मार्गदर्शन आणि मदत उपलब्ध करून द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

कृषी विभागाच्या उपाययोजनांकडे लक्ष

पावसाअभावी बाधित झालेल्या सीताफळाच्या बागांची कृषी विभागाने प्रत्यक्ष पाहणी करून नुकसानीची स्थिती तपासावी, अशी अपेक्षा आहे. शेतकऱ्यांना पाणी व्यवस्थापन, ठिबक सिंचन आणि बागांचे संवर्धन याबाबत मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे. तसेच नुकसान झालेल्या क्षेत्राचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन करून शासनाच्या लागू निकषांनुसार मदतीबाबत कार्यवाही करण्याची मागणी पुढे येत आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



थॉमस मेहलर यांनी मांडली साउथको इंडियाची वाढती भूमिका

पुणे (आरंभ पर्व) : साउथकोचे अध्यक्ष थॉमस मेहलर यांनी पुण्यातील विमान नगर येथील कंपनीच्या कार्यालयात पत्रकारांशी संवाद साधला आणि कंपनीच्या जागतिक कामकाजात भारताची भूमिका कशी वाढत आहे, हे स्पष्ट केले. त्यांच्या सादरीकरणात तीन घडामोडी एकत्र आल्या: स्थानिक उत्पादनाचा मजबूत पाया, यंदा भारतात स्थापन झालेले जागतिक क्षमता केंद्र आणि आखाती बाजारपेठांतील साउथको व दर्शना यांची उपस्थिती. साउथको इंडियाचे कंट्री हेड प्रकाश टी. जॉन आणि व्यवसाय विकासाचे महाव्यवस्थापक वीरेश मनराय हेही पत्रकार परिषदेत सहभागी झाले. मेहलर यांच्यासाठी भारतातील या कामाशी त्यांचा स्वतःचा जुना संबंध आहे. त्यांनी १९९० मध्ये साउथकोमध्ये काम सुरू केले. २०१६ मध्ये अध्यक्ष होण्यापूर्वी त्यांनी युरोप, आशिया प्रशांत आणि अमेरिका या विभागांतील कंपनीच्या व्यवसायाचे नेतृत्व केले. आशिया प्रशांत विभागाची जबाबदारी सांभाळताना साउथको इंडियाच्या सुरुवातीवरही त्यांनी देखरेख केली होती. त्यामुळे पुण्यातील त्यांची भेट ही त्यांनी उभारण्यात हातभार लावलेल्या भारतीय व्यवसायाच्या पुढील भूमिकेवर बोलण्याची संधी ठरली.

इलेक्ट्रिक वाहनांसाठी विशेष फ्लेक्झी इलेक्ट्रिक कार लोनची सुरुवात


मुंबई (आरंभ पर्व) : एचडीएफसी बँक या भारतातील आघाडीच्या खाजगी क्षेत्रातील बँके तर्फे प्रथमच अनोख्या अशा फ्लेक्झी इलेक्ट्रिक कार लोन या नाविन्यपूर्ण ऑटो कार लोनची सुरुवात केली असून ही योजना विशेषरुपाने इलेक्ट्रिक व्हेईकल्स (ईव्हीज) च्या खरेदीसाठी अर्थपुरवठा करण्यासाठी तयार करण्यात आली आहे. फ्लेक्झी इलेक्ट्रिक कार लोन या योजने अंतर्गत इलेक्ट्रिक वाहनांच्या बॉडी आणि बॅटरी साठी वेगवेगळ्या प्रमाणात कर्ज उपलब्ध करुन देणार आहे. यामध्ये बॅटरी वरील कर्ज हे फेडण्यासाठी ग्राहकांना अधिक कालावधी मिळणार आहे. यामुळे ग्राहकांना ईएमआय अधिक चांगल्या प्रकारे भरणे शक्य होणार आहे. ही कर्ज उत्पादन सुविधा बँकेच्या संपूर्ण भारतात असलेल्या ९७०० हून अधिक शाखांमध्ये उपलब्ध असणार आहे. ईव्हीच्या सध्याच्या खर्चाच्या रचने मुळे आयसीई (इंटर्नल कंबश्चन इंजिन) च्या तुलनेत बॅटरीचे वाहन घेणे खर्चिक बाब ठरते, कारण इलेक्ट्रिक वाहनांमध्ये बॅटरी हा घटक सर्वात महाग घटक आहे. बॅटरीसाठीचा ईएमआयचा हिस्सा हा आयसीई वाहनाच्या चालवण्याच्या खर्चा एवढा असेल. हा दृष्टिकोन विकसित होत असलेल्या बॅटरी सबस्क्रिप्शन मॉडेल्ससाठी देखील योग्य आहे, ज्यामुळे ईव्हीची मालकी अधिक सुलभ आणि किफायतशीर बनते.

एआई प्लस स्मार्टफोनची निवडक मॉडेल्सच्या किमतीत वाढ जाहीर



पुणे (आरंभ पर्व) : एआय प्लस स्मार्टफोनने आज आपल्या स्मार्टफोन पोर्टफोलिओमधील निवडक मॉडेल्सच्या किमतीत 15 नोव्हेंबर 2026 पासून वाढ करण्याची घोषणा केली. विशेषतः किमतीबाबत संवेदनशील विभागांमध्ये खर्चाचा दबाव कायम असल्याने, कंपनीने त्याच्या परिणामांचे मूल्यमापन सुरू ठेवले असून ग्राहकांसाठी परवडणारी किंमत राखण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र, कच्च्या मालाचा खर्च उच्च पातळीवर कायम असल्याने, परवडणारी किंमत आणि उत्पादनाचा अनुभव यांच्यातील शाश्वत समतोल राखण्यासाठी कंपनीने आणखी एक संयमित किंमत समायोजन केले आहे. किमती ₹3,000 पर्यंत वाढणार असल्याने, ग्राहकांसाठी त्यांचे आवडते एआई प्लस स्मार्टफोन सध्याच्या किमतीत खरेदी करण्याची हीच उत्तम वेळ आहे. सुधारित किमतींनुसार, एआय पल्स पल्स २ एफई, पल्स २ , नोव्हा २ निओ ५जी, नोव्हा २ पॉवर ५जी, नोव्हा २ प्रो ५जी आणि नोव्हा २ अल्ट्रा ५जी च्या निवडक व्हेरिएंट्सच्या किमतीत ₹1,000 ते ₹3,000 पर्यंत वाढ होईल. एआय पल्स नोव्हाफ्लिप ५जी ची किंमत ₹49,999 वर कायम राहील. उद्योगासमोरील आव्हाने असूनही, एआय प्लस स्मार्टफोन भारतीय ग्राहकांना उत्तम किंमत-अनुभव मूल्य देण्यासाठी कटिबद्ध आहे. कंपनी घटकांच्या किमती आणि बाजारातील स्थितीवर लक्ष ठेवत राहील आणि सुलभ तंत्रज्ञान, विश्वासार्ह कामगिरी व ग्राहकांसाठी दीर्घकालीन मूल्य यावर आपले लक्ष केंद्रित ठेवेल.

दिवाळीत नात्यांचा गोडवा जपण्यासाठी विवोची '#JoyOfHomecoming' मोहीम



नवी दिल्ली (आरंभ पर्व) : दिवाळीच्या सणानिमित्त कुटुंबातील जिव्हाळा, जुन्या परंपरा आणि प्रियजनांसोबत घालवलेल्या क्षणांचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी विवो इंडियाने '#JoyOfHomecoming' ही नवीन मोहीम सुरू केली आहे. बदलत्या जीवनशैलीत आणि धावपळीच्या जगात माणसे एकमेकांपासून दूर राहत असली, तरी कौटुंबिक परंपरा आणि आठवणी त्यांना पुन्हा एकत्र आणतात, हा संदेश या मोहिमेतून देण्यात आला आहे. डेंटसू क्रिएटिव्ह-वेबचटणी यांच्या सहकार्याने तयार करण्यात आलेल्या या मोहिमेच्या चित्रपटात आई आणि मुलाच्या नात्यातील भावनिक बंध उलगडण्यात आले आहेत. विवोच्या 'Live the Joy' या संकल्पनेवर आधारित या चित्रपटातून दिवाळीतील छोट्या परंपरांचे मोठे भावनिक महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे. चित्रपटाची कथा दुबईमध्ये नोकरीनिमित्त वास्तव्यास असलेल्या कबीर या तरुणाभोवती फिरते. कामाच्या व्यस्ततेमुळे कबीरला दिवाळीसाठी घरी परतणे शक्य होत नाही. मात्र, छोटी दिवाळीच्या दिवशी त्याचे बालपणीचे मित्र त्याच्या आईसाठी खास सरप्राईज कार्यक्रम आयोजित करतात. या कार्यक्रमातील क्षण दूरवरून अनुभवताना कबीरचे लक्ष घरातील एका न पेटवलेल्या दिव्याकडे जाते. लहानपणापासून आईसोबत दिवा लावण्याची त्याची परंपरा असते. या आठवणीने भावूक झालेला कबीर अखेर आईसोबत दिवाळी साजरी करण्यासाठी घरी परतण्याचा निर्णय घेतो.

लाखो लिटर चेंबरमधून पाण्याची नासाडी



महापालिका प्रशासनाने तातडीने दखल घेण्याची मागणी

पिंपरी (दै. आरंभ पर्व)

पिंपरी-चिंचवड शहरात सध्या पाणीटंचाईमुळे नागरिकांना एक दिवसाआड पाणीपुरवठ्याचा सामना करावा लागत आहे. पिंपरी चिंचवड शहरातील आकुर्डी, निगडी, दापोडी, फुगेवाडी, कासारवाडी, खराळवाडी, संत तुकाराम नगर, नेहरू नगर, मासुळकर कॉलनी, यशवंत नगर, मोरवाडी, लाल टोपीनगर, डिलक्स चौक वैशालीनगर नानेकर चाळ, रमाबाई नगर, वल्लभनगर भागांतील नागरिकांना पाणी जपून वापरावे लागत असताना, दुसरीकडे नाशिक फाटा येथे चेंबरमधून मोठ्या प्रमाणात पाणी वाहून वाया जात असल्याचे भयानक चित्र समोर आले आहे. पाण्याची ही नासाडी तातडीने थांबविण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

नाशिक फाटा येथील वर्दळीच्या ठिकाणी सकाळी सहा वाजता मोठ्या प्रमाणात चेंबर मधून लाखो लिटर पाणी वाया गेले मागील दोन दिवसांपूर्वीही व्हॉल्व्हमधून मोठ्या प्रमाणात पाणी वाहून जात असल्याचे प्रत्यक्षदर्शी नागरिकांनी सांगितले. त्याचवेळी महापालिका प्रशासनाने या प्रकाराची दखल घेऊन दुरुस्ती केली असती, तर पाण्याचा अपव्यय रोखता आला असता, अशी चर्चा शहरात नागरिकांकडून व्यक्त होत आहे. मात्र, या प्रकाराकडे वेळीच लक्ष दिले गेले नसल्याने पुन्हा मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. शहरात पाणीपुरवठ्याचे नियोजन करताना महापालिका प्रशासनाकडून नागरिकांना एक दिवसाआड पाणी दिले जात आहे. अशा परिस्थितीत उपलब्ध पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा आहे. नागरिकांना पाणी जपून वापरण्याचे आवाहन केले जात असताना, सार्वजनिक जलवाहिन्या किंवा व्हॉल्व्हमधून होणारी गळती तातडीने थांबविणेही तितकेच गरजेचे आहे. नाशिक फाटा येथील प्रकारामुळे पाणीपुरवठा व्यवस्थेच्या देखभाल-दुरुस्तीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. गळती रोखून पाणी वाचविण्याची मागणी

नाशिक फाटा येथील चेंबरची तातडीने तपासणी करून पाणीगळतीचे नेमके कारण शोधावे, संबंधित व्हॉल्व्ह किंवा जलवाहिनीतील दोष त्वरित दुरुस्त करावा आणि भविष्यात अशा प्रकारची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

पाणीटंचाईच्या काळात पाण्याचा प्रत्येक थेंब मौल्यवान असताना, मोठ्या प्रमाणात होणारा अपव्यय थांबविण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने तातडीने घटनास्थळी पाहणी करून गळती बंद करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

सॅप इंडियाचा कौशल्यविकास उपक्रम

पुणे (दै. आरंभ पर्व)

सॅप इंडियाने भारतातील कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि डिजिटल कौशल्यांची वाढती मागणी लक्षात घेऊन २०३० पर्यंत देशातील २० लाख लोकांना भविष्यातील रोजगारासाठी आवश्यक कौशल्यांनी सज्ज करण्याच्या योजनेला अधिक व्यापक करण्याची घोषणा केली आहे. शैक्षणिक संस्था, सरकारी यंत्रणा, उद्योग क्षेत्रातील भागीदार आणि सामाजिक संस्थांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या माध्यमातून एआय, क्लाउड, डेटा आणि एंटरप्राइज तंत्रज्ञानातील कौशल्ये विकसित करून रोजगाराच्या नव्या संधींसाठी मनुष्यबळ तयार करण्यावर भर दिला जाणार आहे. भारतामध्ये जागतिक स्तरावरील स्टेम (विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित) क्षेत्रातील कर्मचाऱ्यांपैकी २८ टक्के, तर सॉफ्टवेअर इंजिनिअर्सपैकी २३ टक्के कर्मचारी असल्याचे सॅपने नमूद केले आहे. तसेच, जगभरातील सॅप प्रमाणित शिक्षार्थींपैकी ४८ टक्के भारतातील असल्याचे कंपनीने म्हटले आहे. या पार्श्वभूमीवर भारतातील तंत्रज्ञानविषयक कौशल्यविकासाला गती देण्याचा कंपनीचा प्रयत्न आहे. जागतिक स्तरावर २०३० पर्यंत १ कोटी २० लाख लोकांना एआयशी संबंधित कौशल्यांनी सुसज्ज करण्याचे सॅपचे उद्दिष्ट आहे.

ग्राहक हक्क समितीच्यावतीने एक लाख अकरा हजार रुपयांची देणगी

राजगुरूनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)

खेड तालुका ग्राहक हक्क समितीच्या वतीने समितीचे संस्थापक अध्यक्ष स्व.माधवराव संभुस यांच्या स्मरणार्थ येथील जैन धर्मार्थ हॉस्पिटलला एक लाख अकरा हजार एकशे अकरा रुपयांची देणगी देण्यात आली.

चार्तुमासानिमित्त येथील जैन स्थानक येथे उपस्थित असलेल्या जैन मुनींच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात जैन श्रावक संघ तसेच जैन धर्मार्थ हॉस्पिटलचे विश्वस्त संतोष बोथरा, मनोज कासवा, अजय बलदोटा यांच्याकडे मदतीचा धनादेश सुपुर्द करण्यात आला. याप्रसंगी खेड तालुका ग्राहक हक्क समितीचे अध्यक्ष रंगनाथ सुतार, माजी अध्यक्ष रविंद्र गुजराथी, माजी सरपंच प्रदीप कासवा, माजी उपसरपंच संजय कुंभार, निलेश संभुस, विष्णू बोऱ्हाडे, महेंद्र वाळुंज, प्रा. अविनाश शिंदेकर, परेश शहा, रामदास रणदीवे, छगनलाल ओसवाल आदी मान्यवर उपस्थित होते.



स्व. माधवराव संभुस यांच्या स्मरणार्थ उपक्रम

प्रास्ताविकात रविंद्र गुजराथी म्हणाले, खेड तालुका ग्राहक हक्क समितीचे संस्थापक अध्यक्ष म्हणून माधवराव संभुस यांनी ग्राहकांच्या हक्कांसाठी आवाज उठवला. परखड आणि सत्य बोलणं हा त्यांचा स्वभाव होता. एखादी गोष्ट चुकीची वाटली तर ती स्पष्टपणे सांगायची आणि सर्वसामान्य माणसाचं काम असेल तर त्यासाठी धावून जायचं, ही त्यांची खासियत होती. सर्वसामान्य माणसाच्या अडचणीच्या वेळी त्याच्या पाठीशी उभं राहण्याची त्यांची वृत्ती अनेकांच्या कायम स्मरणात राहणार आहे. त्यांच्या स्मृती रुग्नसेवेच्या रुपात समाजात चिरंतन रहाव्यात याचसाठी समितीच्या वतीने देणगी रुग्नालयास दिली आहे.

यावेळी मान्यवरांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अजय बलदोटा यांनी केले. समितीचे अध्यक्ष रंगनाथ सुतार यांनी आभार मानले.

राजगुरू महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना इस्रो भेटीची संधी

- 'कलाम स्ट्रीम चॅलेंज २०२६' स्पर्धेत विद्यार्थ्यांचा सहभाग

राजगुरूनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)

येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) या प्रतिष्ठित संस्थेला आगामी डिसेंबरमध्ये भेट देण्याची संधी मिळाली आहे. पिंपरी-चिंचवड येथील एएसएम महाविद्यालयात झालेल्या कलाम स्ट्रीम चॅलेंज २०२६ स्पर्धेतील सहभागामुळे विद्यार्थ्यांना इस्रो भेटीची संधी प्राप्त झाली आहे. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम इंटरनॅशनल फाउंडेशन, हाऊस ऑफ कलाम, रामेश्वरम यांच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, संशोधनवृत्ती, उपक्रमशीलता आणि सृजनशीलता विकसित करणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश होता. इयत्ता सहावी ते बारावी तसेच अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन आणि पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. या स्पर्धेत हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील बारावी विज्ञान शाखेतील ओम भास्कर काठोळे आणि सिद्धेश शंकर पानमंद, बारावी वाणिज्य शाखेतील कृष्णा किशोर राठोड, तन्वी महेंद्र खिलारी आणि चैत्राली नरेंद्र भोसुरे यांनी 'व्ही योरा ओ. एस.' या प्रकल्पाद्वारे सहभाग घेतला.



तसेच अकरावी विज्ञान शाखेतील कृष्णा अनिल अभंग आणि सोहम मोहन बोंबले यांनी 'स्मार्ट फायर डिटेक्टर 'हा प्रकल्प सादर केला. प्रा. मनीषा साबळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना इस्रोसारख्या प्रतिष्ठित वैज्ञानिक संस्थेला भेट देण्याची मिळालेली संधी त्यांच्या वैज्ञानिक जिज्ञासेला चालना देणारी आणि भविष्यातील संशोधनासाठी प्रेरणादायी ठरणार आहे. या यशस्वी सहभागाबद्दल विद्यार्थ्यांचे कौतुक संस्था व महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, मानद सचिव नानासाहेब टाकळकर, संचालक विशाल थिगळे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य प्रा. विठ्ठल दौंडकर, प्रबंधक नारायण शिंदे उपस्थित होते.

ट्रूकॉलरने भारतात लॉन्च केले 'ट्रूकॉलर लाईट' ॲप

पुणे (दै. आरंभ पर्व)

डिजिटल युगात सुरक्षित संवादासाठी जगातील कोट्यवधी युजर्सचा विश्वास असलेल्या 'ट्रूकॉलर'ने आज भारतात आपल्या विशेष नवीन 'ट्रूकॉलर लाईट' ॲपच्या लाँचिंगची घोषणा केली आहे. कमी स्टोरेज, मर्यादित मेमरी आणि प्रोसेसिंग पॉवर असलेल्या अँड्रॉइड स्मार्टफोन्ससाठी हे ॲप विशेष रूपाने तयार करण्यात आले आहे. अवघ्या १० एमबी आकाराचे हे ॲप क्षणात इन्स्टॉल होते, अत्यंत वेगाने उघडते आणि ४ जीबी पर्यंत रॅम असलेल्या मूलभूत अँड्रॉइड स्मार्टफोन्सवरही अत्यंत सहजतेने चालते. मोबाईलमध्ये स्टोरेज स्पेस कमी असली तरीही युजर्सना नको असलेले स्पॅम आणि फ्रॉड कॉल्स ओळखण्यासह ते ब्लॉक करण्याची मुख्य ट्रूकॉलर ॲपसारखीच भक्कम सुरक्षा आता या लाईट व्हर्जनद्वारे मिळणार आहे. भारतातील सर्वात व्यस्त सणासुदीच्या आणि खरेदीच्या काळात हे ॲप लाँच करण्यात आले आहे. या काळात बनावट डिलिव्हरी कॉल्स, आकर्षक वाटणाऱ्या फेक ऑफर्स आणि केवायसी फसवणुकीचे सायबर स्कॅम कॉल्स अचानक वाढतात. कोट्यवधी नागरिकांसाठी त्यांचा स्मार्टफोन हा डिजिटल पेमेंट, डिलिव्हरी अलर्ट्स आणि कुटुंबाशी संपर्कात राहण्याचे मुख्य माध्यम आहे.



क्वांटम तंत्रज्ञानावर भर दिल्यास देशाचा विकास अधिक वेगाने होईल

डॉ. अरविंद नातू यांचे प्रतिपादन; पुणे विद्यार्थी गृहाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन



पुणे (दै. आरंभ पर्व)

"मागील काही वर्षात तंत्रज्ञान वेगाने बदलत आहे. भारत म्हणून आपण क्वांटम टेक्नॉलॉजीमध्ये काही प्रमाणात मागे आहोत. पण येत्या काळात या तंत्रज्ञानावर भर दिल्यास आपला वेगाने विकास होईल. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात आंतरविद्याशाखीय अभ्यास होण्याची आवश्यकता आहे. बायोमेडीकल इंजिनिअरींग, मटेरीयल इंजिनिअरींग आणि मेटलर्जी यांसारख्या शाखांची व्याप्ती मोठी असून, त्यात काम व्हायला हवे," असे प्रतिपादन भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्थेचे सल्लागार व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अरविंद नातू यांनी केले. पुणे विद्यार्थी गृहाच्या अभियांत्रिकी, तंत्रज्ञान व व्यवस्थापन महाविद्यालयामध्ये 'ॲडवान्सेस इन इंजिनिअरिंग, टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट' या विषयावरील तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. नातू बोलत होते. यावेळी व्यासपीठावर अलिकॉन ग्रुपचे स्ट्रॅटेजिक बिझनेस डेव्हलपमेंट प्रमुख हर्षवर्धन गुणे, एज्युलॅब ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक केन यानागिनोउची, पुणे विद्यार्थी गृहाचे संचालक राजेंद्र कडूसकर, माजी अध्यक्ष व संचालक सुनील रेडेकर, इंजिनिअरींग महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संदिप पाटील व परिषदेचे संयोजक डॉ. रविंद्र एदलाबादकर व डॉ. मनमोहन भूमकर उपस्थित होते. डॉ. अरविंद नातू म्हणाले, "जनरेशन झीने नव्याने येणारे तंत्रज्ञान आत्मसात करायलाच हवे, नाहीतर त्यांचा टिकाव लागणे अवघड होईल. आता इंडस्ट्री ५.० वेगाने विकसित होत असून, ती मानवकेंद्रित आहे. एआय आल्यामुळे अनेकांच्या नोकऱ्या जातील, कौटुंबिक आयुष्य खराब होईल असे बोलले जात होते. हे काही प्रमाणात खरे असले तरी आपण या तंत्रज्ञानासोबत जुळवून घेतले तर आपण नक्कीच पुढे जाऊ शकतो. यासाठी आपल्याकडे इच्छाशक्ती, क्रियाशीलता यांसारख्या गोष्टी असायला हव्यात."

बहुशाखीय शिक्षणाची गरज : गुणे

महत्त्वपूर्ण खनिजे आणि दुर्मीळ मृदा मूलद्रव्ये याबद्दल फारच कमी जणांना माहिती आहे. ही क्षेत्रे जागतिक स्तरावर उदयास येणारी महत्त्वाची क्षेत्रे आहेत आणि पीव्हीजीसारख्या वारसा असलेल्या शैक्षणिक संस्थांनी राष्ट्रीय प्राधान्यक्रमांशी पूर्णपणे जोडले गेले पाहिजे. केवळ वाहन उद्योग किंवा एखाद्या विशिष्ट क्षेत्रावर लक्ष केंद्रित न करता देशाच्या गरजा आणि प्राधान्यक्रम लक्षात घेऊन अभ्यासक्रम विकसित केले पाहिजेत. नव्या युगातील उद्योगक्षेत्र केवळ एका शाखेवर अवलंबून नाही. यामध्ये यांत्रिकी, इलेक्ट्रॉनिक्स आणि इतर विविध शाखांतील ज्ञान व कौशल्यांचा एकत्रित वापर होतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी बहुविद्याशाखीय ज्ञान आत्मसात करणे आवश्यक आहे, असे हर्षवर्धन गुणे यांनी नमूद केले.

म्हणजे जागतिक अनिश्चितेतेच्या काळात भारत हा अत्यंत ठाम भूमिका घेणारा देश आहे. भारताची वाढती ताकद, तंत्रज्ञान क्षेत्रातील महासत्ता बनण्याच्या दिशेने सुरू असलेली वाटचाल आणि देशातील तरुणांची मोठी लोकसंख्या या बाबी भारताचे भविष्य घडवत आहेत. अवकाश तंत्रज्ञान आणि अवकाश क्षेत्रातील उत्पादननिर्मिती हे आता एक मोठे आर्थिक क्षेत्र बनले आहे." राजेंद्र कडूसकर यांनी प्रास्ताविकात आंतरराष्ट्रीय परिषदेमागची भूमिका स्पष्ट केली. दि. २८ ते ३० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत पुणे विद्यार्थी गृहाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात ही परिषद होत आहे. बदलत्या तंत्रज्ञानाच्या काळात संशोधक, नवनिर्माते, विद्यार्थी आणि प्राध्यापक यांच्यात समन्वय होण्याच्या दृष्टीने ही परिषद महत्त्वाची आहे.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.